स्थापना : दि. ५ मे २००८
नों.क्र.महा./२४९२९/को./११/०७/०८

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

वर्ष चौदावे : अंक एकेचाळीसावा व बेचाळीसावा

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, एप्रिल-मे-जून २०२५ (जोडअंक)

## भाषा आणि साहित्याभ्यासाचे आंतरविद्याशाखीय स्वरूप




कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे



नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. २३१९-६०२५

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

वर्ष चौदावे : अंक एकेचाळीसावा व बेचाळीसावा

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२५, एप्रिल-मे-जून २०२५ (जोडअंक)


## भाषा आणि साहित्याभ्यासाचे आंतरविद्याशाखीय स्वरूप
## राष्ट्रीय चर्चासत्र विशेषांक


**• अतिथी संपादक •**

प्रा. डॉ. अरुण शिंदे

**• संपादन सहाय्य •**

प्रा. डॉ. निलेश शेळके । प्रा. डॉ. बळवंत मगदूम । प्रा. डॉ. मांतेश हिरेमठ

**पत्रिका संपादक मंडळ**

**• संपादक •**

प्रा. डॉ. नंदकुमार मोरे

**• सदस्य •**

प्रा. डॉ. देवानंद सोनटक्के । प्रा. डॉ. जयवंत दळवी । प्रा. डॉ. सुभाष पाटील



**• प्रकाशक •**

प्रा. डॉ. भरत जाधव

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

द्वारा : द्वारकाधिश, साईनगरी, नागठाणे,

ता.जि. सातारा ४१५५१९

**• मुद्रक •**

भारती मुद्रणालय

८३२, ई वॉर्ड, शाहूपुरी चौथी गल्ली, कोल्हापूर.

फोन नं.: ०२३१-२६५४३२९

ही संशोधन पत्रिका प्रकाशक डॉ. भरत जाधव, यांनी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यासाठी भारती मुद्रणालय, कोल्हापूर येथे छापून द्वारकाधिश, साईनगरी, नागठाणे, ता.जि. सातातरा ४१५५१९ येथे प्रकाशित केली. या पत्रिकेत प्रकट झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

१०३ डिजिटल माध्यमे आणि मराठी भाषेचे बदलते स्वरूप / प्रा. डॉ. ज्योती सुबराव माने ........ २८६
१०४ पत्रकारिता : भाषिक कौशल्य / डॉ. अनुसया नागनाथ नागीमे ........ २८८
१०५ 'तृष्णा' या आदिवासी आत्मकथनातील भाषावैभव / प्रा.डॉ. कल्पना डी. गोरले-थोरात ........ २९०
१०६ लोकसाहित्याचा आंतरविद्याशाखीय अभ्यास / प्रा. डॉ. नवनाथ अंगद शिंदे ........ २९४
१०७ भाषा, बोली आणि संस्कृती सहसंबंध / साधना अरुण खोमणे ........ २९७
१०८ मराठी भाषा, साहित्य आणि पत्रकारितेचा अनुबंध / डॉ. केशव धोंडिबा टिपरसे ........ २९९
१०९ 'मोराची बायको' या कथासंग्रहातील व्यक्तिरेखांचा मानसशास्त्रीय अभ्यास / निलम नंदलाल अडसुळे........ ३०१
११० बालसाहित्य आणि बालगीतांतून प्रकट होणारे भावविश्व / डॉ. सरस्वती लक्ष्मणराव अंदेलवार ........ ३०३
१११ अभिजात मराठीचे लेखन / प्रा.डॉ.प्रवीण चंदनशिवे ........ ३०६
११२ चित्रपट भाषा : एक अभ्यास / प्रा.डॉ. विठ्ठल पंढरीनाथ लंगोटे ........ ३०८
११३ आदिवासींच्या 'दंडार' उत्सवातील लोकगीतांमधून आविष्कृत होणारे समाजजीवन /
राजेंद्र विश्वनाथ कुळमेथे, मार्गदर्शक : प्रा.डॉ.संजय केशवराव लाटेलवार ........ ३१०
११४ अध्यात्मिक शाहिरी : एक स्वतंत्र अभ्यासक्षेत्र / प्रा. डॉ. पांडुरंग ऐवळे ........ ३१४
११५ मराठी भाषा आणि अन्य भाषांचा परस्परसंबंध / प्रा. डॉ. एकनाथ शामराव पाटील ........ ३१७
११६ शासकीय कामकाजातील कार्यालयीन भाषा व भाषा धोरण / डॉ. संतोष शहापूरकर ........ ३२०
११७ मराठी भाषा विकासाची आव्हाने आणि उपाय / डॉ. रविकांत शिंदे ........ ३२२
११८ मराठी भाषा, साहित्य व खेळ / डॉ. लोहिता माने ........ ३२६
११९ इंग्रजी भाषांतरित 'फकिरा' कादंबरीतील व्यक्तिरेखांचा अभ्यास / डॉ. वैजयंतीमाला आप्पासाहेब जाधव ........ ३२८
१२० मानवी विकास आणि भाषा उत्पत्ती / प्रांजली सत्यवान क्षीरसागर ........ ३३१
१२१ मराठी कवितेचा राजकीय परिप्रेक्ष्य / डॉ. बळवंत मारुती मगदूम ........ ३३५
१२२ मराठी भाषा आणि सोशल नेटवर्किंग /
श्री. गौरीशंकर दत्तात्रय खोबरे, मार्गदर्शक : डॉ. तानाजी अंबादास देशमुख ........ ३३८
१२३ मराठी भाषा : सध्यस्थिती आणि रोजगाराच्या संधी / प्रा. डॉ. अशोक शेलार ........ ३४१
१२४ मराठी विज्ञान कथात्मक साहित्यातील प्रयोगशीलता / प्रा. एस. बी. डफळापूरकर ........ ३४४
१२५ मराठी साहित्याच्या आंतरविद्याशाखीय संशोधनाच्या दिशा / प्रा. डॉ. सविता सुनिल केंजळे ........ ३४६
१२६ 'भिवा फरारी' या कादंबरीचा समाजशास्त्रीय अभ्यास / प्रा. डॉ. मनोज बापुसाहेब तेलोरे ........ ३४८
१२७ मराठीतील आदिबंध / सुनिता दुधाट, मार्गदर्शक : डॉ. माहेश्वरी गावीत ........ ३५१
१२८ मराठीतील निसर्गविषयक साहित्य / डॉ. प्रदीप यशवंत पाटील ........ ३५३
१२९ महर्षी विठ्ठल रामजी शिंदे समग्र वाङ्मय : आंतरविद्याशाखीय संदर्भ / डॉ. प्रवीण लोंढे ........ ३५६
१३० मानवी विकास आणि भाषा / डॉ. सायली आचार्य ........ ३६०
१३१ जागतिकीकरण आणि मराठी भाषा / प्रा. मच्छगंधाली नितीन तारळेकर ........ ३६३
१३२ लोकगीतातील स्त्रियांची भाषा / प्रो. डॉ. सविता अशोक व्हटकर ........ ३६६
१३३ लोकतत्त्वीय अभ्यासपद्धती : स्वरूप आणि निकषव्यवस्था / डॉ. आप्पासो आनंदा बुडके ........ ३६९
१३४ लोकदैवतांविषयक मौखिक साहित्याचा आंतरविद्याशाखीय अभ्यास / डॉ. सदाशिव पाटील ........ ३७२
१३५ वचनसाहित्य आणि संविधानिक मूल्ये / प्रा. प्रकाश बाळू नाईक ........ ३७५
१३६ वाङ्मयीन संस्कृती / सौ. उज्वला सुनिल लांडगे ........ ३७८
१३७ विद्रोहाची-परिवर्तनाची भाषा / डॉ. विजयकुमार रामदास घोडके ........ ३८०
१३८ वैचारिक साहित्याचे स्वरूप / डॉ. शशिकला भीमराव रणदिवे ........ ३८३


ISSN No. 2319-6025

# बालसाहित्य आणि बालगीतांतून प्रकट होणारे भावविश्व

**डॉ. सरस्वती लक्ष्मणराव अंदेलवार**

सहाय्यक प्राध्यापक, पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, कवठेमहांकाळ, जि.सांगली

**प्रस्तावना**

बालसाहित्य म्हणजे मोठ्या माणसांनी लहान मुलांसाठी लिहिलेले वाङ्मय. या वाङ्मयात राजाराणी, राजकन्या, पऱ्या, देवदूत, बोलणारे प्राणी, जादूगार, राक्षस, आणि सद्गुणी, दुर्गुणी माणसे असतात. असे वाङ्मय लिहिणारे जगात अनेक लेखक होऊन गेले. मराठीतही बालसाहित्य लिहिणारे अनेक लेखक आहेत. बालसाहित्यात अगदी छोट्या बाळांसाठी बडबड गीते वाचता येणाऱ्या लहान मुलांसाठी कविता, नीतिकता, सहज कथा, अन्य गमतीदार कथा, प्रवासवर्णने आणि कधीकधी छोट्या कादंबऱ्या असतात.

**बालसाहित्याची मूल्ये**

बालसाहित्य महत्त्वाचे आहे. कारण त्यातून विद्यार्थ्यांना साहित्याला प्रतिसाद देण्याची संधी मिळते हे विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वतःच्या सांस्कृतिक वारशाबद्दल तसेच इतरांच्या सांस्कृतिक वारसाची प्रशंसा करते. हे विद्यार्थ्यांना भावनिक बुद्धिमत्ता आणि सर्जनशीलता विकसित करण्यात मदत करते हे विद्यार्थ्यांच्या वाढीस आणि विकासाचे पालन पोषण करते. मुलांमध्ये अनुकरणशील, जिज्ञासा आणि कल्पनाशक्ती खूप असते. अनुकरण यामुळे त्यांच्या चरित्राचा विकास होतो. जिज्ञासामुळे त्यांचे ज्ञान वाढते आणि कल्पनाशक्ती मुळे त्यांचे जीवन कसे जगावे यांचे ज्ञान त्यांना प्राप्त होते. या तिन्ही गोष्टीसाठी बालसाहित्याची आवश्यकता आहे.

बालसाहित्यातील बालगीतांचा प्रवाह पाहताना सुरुवातीला साने गुरुजी वा.गो.मायदेव, भवानीशंकर पंडित, ताराबाई मोडक, गोपीनाथ तळवळकर, शेष नामले, ग.ह.पाटील, संजीवनी मराठे, शांता शेळके वगैरे मंडळी स्वातंत्र्यपूर्व काळाचा उंबरठा ओलांडून उत्तरकाळात आली. बालकाव्य सोप्या शब्दातले नादमधुर मुलांच्या विश्वातल्या विषयावर पण छोटेसे असले तर मुलांना किती आवडते हे बालकवी, रे. टिळक व दत्तकवींनी पूर्वीच पटवून दिले होते. मायदेव, शांता शेळके, ग.ह.पाटील, राजा मंगळवेढे यांनी लिहिलेल्या कविता गोड आणि मुलांना सहज समजतील अशा आहेत.

बालकांचा ओघ कल्पना जगतात रोजच्या विषयाकडे वास्तव जगाकडे नि अवघडाकडून सोप्याकडे वळला हे उपयुक्त रचनावरून दिसून येईल. रोज दिसणारी निसर्गदृश्य, घडणारे प्रसंग यातला गोडवा मुलांना दाखवण्याचा कवींनी अधिक प्रयत्न केला आहे. बालकाव्याच्या प्रांतात ताराबाई मोडक, संजीवनी मराठी, शांता शेळके, लीलावती भागवत, सुमती पाडगावकर, सरिता पदकी, सरला देवधर, सरोजिनी बाबर, मंदा बोडस, वंदना विटणकर, शिरीष पै, ताराबाई परांजपे, तारा वैशंपायन, विजया वाड, डॉ. वी. म. कुलकर्णी, सूर्यकांत खांडेकर, मा.गो.काटकर, ग.दि.माडगूळकर, राज मंगळवेढेकर, आनंद घाटुगडे, महावीर जोंधळे, यांनी मनोरंजक सोप्या, छोट्या, सुंदर कविता आणि गोड बालगीते लिहून बालसाहित्याचा काव्यविभाग खूपच फुलवला. 'सांग सांग भोलानाथ'(मंगेश पाडगावकर) आणि 'एका तळ्यात होती बदके पिल्ले सुरेख' (ग.दि.माडगूळकर) ही गीते कोण विसरू शकेल. अशा अनेक बालगीतांचा साठा मराठी साहित्यात आहे हे बालसाहित्यकारामुळेच शक्य होऊ शकले.

बालगाणी, बडबड गीत आणि बालगीत याचं प्रमाणही इतर शिशु साहित्य प्रकाराच्या मानाने जास्त आढळतं अशा कविता गाणी मुलांच्या भविष्याशी आणि कल्पनाविश्वाची जवळीक साधणाऱ्या असतात त्यांची प्राण्यांशी, निसर्गाशी अवतीभवतीच्या जगाशी त्यामुळे माहिती जुळते त्यांचा निरागस भावभावनांची जपणूक करायला जीवनातला आनंद लुटायला पशुपक्षी, निसर्ग, चंद्र-तारे या सर्वांशी नाते जोडायला या साहित्याचा फार उपयोग होतो. अन्यायाचा प्रतिकार झालाच पाहिजे. चांगलं वागणाऱ्याला बक्षीस मिळलेच पाहिजे आणि दुष्टाला शिक्षा भोगायलाच हवी व त्यांच्या नैसर्गिक न्यायव्यक्तीची जोपासना अशा साहित्यातून होते. विविध प्रकारच्या जातीवंत स्वरविलासांनी शिंगारलेले व अशिक्षितांनी कित्येक वर्षामागे रचले असताही केवळ पाठांतराच्या बळावर पिढ्यान्पिढ्या आपल्या नवनवोन्मोशालिनी तेजाने पुढच्या पिढीला उत्तेजित करणारे भावगीत म्हणजे लोकगीत होय. अशी व्याख्या सरोजिनी बाबर यांनी केली आहे.

दुर्गाबाई भागवतांच्या मते, लोकगीत हे संपूर्ण ललित प्रवृत्तीचे काव्य नसून, कमालीचे आत्मनिष्ठ असते. काव्यवस्तूचा आविष्कार लोकगीतात अत्यंत गांभीर्यपूर्ण असा असतो. लोकगीते ही भावनांनी काठोकाठ भरलेली असतात. तसेच बालगीतातील भावना फार महत्त्वाचे असतात. मुलांचे संगोपन आणि त्यांच्याविषयीचा वत्सल भाव हा स्त्रीगीतांमध्ये येणारा महत्त्वाचा विषय असतो. मुलांना झोपवताना, दूध पाजताना, खाऊ घालताना स्त्रिया बालगीते म्हणतात. ही गाणी बरीचशी बाळाबरोबर केलेल्या संवादासारखे असतात आणि बरेचदा बालगीतातून फळे, फुले, प्राणी, पशु, पक्षी या सर्वांची ओळखसुद्धा मुलांना करून देण्याचे प्रयत्न करतात.

'इथे इथे नाच रे मोरा, बाळ घाली चारा,
चारा खा, पाणी पिऊन उडून जाई'

असे मुलाला खेळण्यासाठी म्हटलेले बालगीत किंवा

'गोरा गोरा गोमटा, नाकात चपटा डोक्यावर शेपटा'

असे टिकलीच्या खेळातले खेळगाणे ही बाळगीतेची अनेक रूपे लोकगीतात दिसतात. बाळाला झोपविण्यासाठी 'बाळा जो जो रे दशरथ नंदना' यासारखी पाळणा गीते किंवा अंगाई गीते गायली जातात.

मुलाला कुणाची नजर लागू नये याची आईला सतत काळजी असते. त्यासाठी ती अधूनमधून बाळाची दृष्ट काढत असते त्यावेळीही त्याठिकाणी गाणी म्हणतच दृष्ट काढते काही उदाहरणे अशी –

'तानिया तानिया माझ्या रेणुका,
आता दृष्टी झाली ताना बाळाच्या श्रीमुखा'

किंवा

'दात डाळिंबाचे दाणे ओठपोवळ्याच्या
वेली तान्हं ग माझे बाळ,
त्याला ग दृष्ट झाली, तानियाला दृष्ट लागली,
मिठाचे ग झाले पाणी,
तान्हं ग माझे बाळ, कोमेजले फुलावणी'

स्त्रीच्या मनातली ही कोमलता सहज स्वाभाविकपणे तिच्या गीतात अलंकारिकपणे अभिव्यक्त होते. बाळाचे दात डाळिंबाच्या दाण्यासारखे आणि ओठ पवळ्यांच्या वेलीसारखे या उपमेतून बालपणाचा कोवळेपणा अलवारपणा आपोआप व्यक्त होतो. तो स्त्रीमनाच्या कोवळीकेतूनच जन्माला आलेला असतो.

विशाल विश्वाच्या कुशीत बाळ गोपाळांचे एक वेगळीच रम्य व उदात्त विश्व आहे. विविध भावभावनांच्या रसाळ फळांनी आणि सुंदर व सुगंधित पुष्पांनी ते भरलेले आहे. ग्रामीण स्त्रियांनी, मातांनी बालगोपाळांच्या विश्वात जी विविधता निर्माण करून सहज स्फूर्तीने गीतरूपी बोलकी गंगा निर्माण केली त्याचे मूळ काव्यसृष्टीत विशेष आहे. काही गीते लहान मुलास उद्देशून पिढ्यान्पिढ्या म्हटले गेले आहे.

साधारणतः वर्षभराच्या बाळास काऊ-चिऊ वगैरे पक्षी, त्यांचे वेगवेगळे आवाज समजू लागलेले असतात. त्या दृष्टीने हे गीत बाळाला पक्ष्यांची ओळख करून देण्यास उपयुक्त ठरते काऊ, चिऊ, खाऊ, पिऊ, जेऊ या अनुप्रासयुक्त नादमय शब्दांचा वापर या गीतांचा एक महत्त्वाचा विशेष होय.

लहान मुलांसाठी म्हटले जाणाऱ्या गाण्यांना बडबड गीते म्हणतात. यामध्ये ताल, लय, ठेका यांना विशेष महत्त्व दिले जाते. म्हणजे यात लहान मुलांची निरर्थक गाणी असतात.

'अडगुल मडगुलं सोन्याचं कडगुलं
रुपयाचा वाळा तान्या बाळा तीट लावू'

'चांदोबा चांदोबा भागलास का?
लिंबोणीच्या झाडामागे लपलास का'

अशी काही गीते महाराष्ट्रात सगळीकडे स्त्रिया गात असतात. लहान मुलांच्या मुखोद्गत असणारे काही गाणी आहेत. जसे की, पावसाची सुरुवात झाली की मुले आनंदाने नाचतात आणि त्यावेळी त्यांच्या तोंडून शब्द ताल धरून बाहेर पडतात.

'येरे येरे पावसा तुला देतो पैसा
पैसा झाला खोटा पाऊस आला मोठा'

या गीतांना विशिष्ट लय प्राप्त व्हावी यासाठी यमकांची जाणीवपूर्वक जुळवणी केलेली असते. अशी अनेक गाणी बालकांना मुखोद्गत असतात. ग्रामीण भागात आजही गाणी मुले गाताना दिसतात. काही गाणी विशेषतः मुली गातात.

'झिम्म पोरी झिम्म, कपाळाचं भिंग
भिंग गेला फुटून पोरी आल्या उठून'

अशी काही गीते महाराष्ट्र सगळीकडे मुलांना तोंडपाठ असतात. ही गाणी फक्त मुलेच नव्हे तर स्त्रियांच्या तोंडून कित्येक वेळी गाणे जाताना दिसून येतात. मुली एकमेकींच्यासमोर थांबून टाळ्या वाजवत हे गाणे म्हणतात.

भारतीय परंपरेत दिवा लावून नमस्कार करण्याची परंपरा शतक न् शतकांपासून प्रचलित आहे.

'दिव्या दिव्या दीपत्कार
कानी कुंडल मोतीहार
दिव्याला पाहून नमस्कार'

या गीतात कानातल्या कुंडलांचा आणि गळ्यातील


ISSN No. 2319-6025

मोतीहाराचा उल्लेख आढळतो. अशा गाण्यातून मुलांवर नकळत संस्कार होताना दिसतात. ग्रामीण भागातील असंख्य मुले ही गाणी तोंडपाठ म्हणून गाऊन दाखवतात. ही गाणी बाळगोपाळांच्या विश्वासंबंधी अत्यंत हृदयगम अशी असंख्य लोकगीते आहेत. या गीतांचा खरोखरच शोध घेतला म्हणजे निरक्षर स्त्रियांच्या अलिखित संपन्न प्रतिभेचे व रसपूर्ण कल्पना वैभवाचे अभिमानाने कौतुक केल्या वाचून राहत नाही.

**समारोप**

लोकगीतांमध्ये बालकांचा भाग हा समृद्ध असा आहे. नादमाधुर्य साधीसुधी शब्दरचना एक प्रकारची या गीतांची वैशिष्ट्ये आहेत. ही गाणी मात्र हृदयातील नैसर्गिक भावनेच्या प्रामाणिक आविष्कारामुळे ती सजीव वाटतात. हाच सजीवपणा मुलांच्या खेळाच्या गाण्यांमधूनही आढळतो. प्रत्यक्षात खेळताना मुलांमध्ये जो उत्साह ओसंडून वाहत असतो तोच जणू शब्दरूप घेत असतो. त्या शब्दांना कित्येकदा अर्थ नसतो, त्याची रचनाही सुसंबंध नसते; पण त्याचे वय, चित्र असे वैशिष्ट्यपूर्ण आहे. या अशा बालगीतांतून बालकांचे भावविश्व समृद्ध होते.

**संदर्भ**


१. लीलावती भागवत, मराठी बालसाहित्य प्रवाह आणि स्वरूप, नवीन उद्योग, पुणे, प्रथम आवृत्ती.

२. प्रभाकर मांडे, लोकसाहित्याचे स्वरूप, गोदावरी प्रकाशन, मंगलप्रभा, औरंगाबाद.

३. लोकवाङ्मय, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्रथम प्रकाशन-सप्टेंबर,२००२.

४. डॉ.पुरुषोत्तम कालभूत, लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन, विजय प्रकाशन, नागपूर, पहिली आवृत्ती.


◆◆◆

(पृ. क्र. ३०५ वरुन पुढे चालू)

## मराठी भाषा, साहित्य आणि पत्रकारितेचा अनुबंध / डॉ. केशव धोंडिबा टिपरसे

**निष्कर्ष**

१) मराठी भाषा, साहित्य आणि पत्रकारिता यांची भूमिका ही परस्परपूरक असून साहित्यिक अभिरुची वाढविण्याबरोबरच वाचनसंस्कृती जतन करताना दिसून येते.

२) साहित्य आणि पत्रकारिता समाज मनाची जडणघडण आणि राष्ट्रभावना दोन्ही बाबी साध्य करताना दिसून येतात.

३) साहित्य आणि पत्रकारितेचा अनुबंध कायम टिकल्यास सद्गुणी समाज निर्माण करता येतो.

४) अनेक प्रतिभावंत साहित्यिकांनी आपल्या प्रतिभेला वृत्तपत्रातील लेखनाच्या माध्यमातून वाट करून दिली असल्याने साहित्य आणि पत्रकारिता यांचा विकास झाल्याचे दिसून येते.

५) मराठी पत्रकारिता स्वरूप स्वातंत्र्यपूर्व काळात ध्येयवादी होते. विसाव्या शतकात व्यवसायवादी झाले आणि एकविसाव्या शतकात उद्योगाचे स्वरूप प्राप्त झाल्याचे दिसून येते.

**संदर्भ**


१) पानतावणे गंगाधर, पत्रकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

२) घोरपडे बाबासाहेब, आकांक्षा पत्रकारितेच्या, वृत्तविद्या प्रबोधिनी, पुणे.

३) परांजपे प्र. ना., पत्रकारितेचे मूलतत्त्वे: प्रभाकर पाध्ये, मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे.

४) नेरलीकर शोभा, जागतिकीकरणातील बदलती पत्रकारिता, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

५) जोशी सु.ह., मराठी पत्रकारिता पहिली पाऊले, डायमंड पब्लिकेशन, पुणे.


◆◆◆